# मोरगावचा श्री मयुरेश्वर/ मोरेश्वर

**ज्याची इच्छा धरावी, ती गोष्ट मोरया देई ... अशी आहे याची ख्याती...**



**मोरया मोरया मी बाळ तान्हे ।**
**तुझीच सेवा करु काय जाणे ।**
**अन्याय माझे कोटयानुकोटी ।**
**मोरेश्वरा बा तू घाल पोटी ।।**

**कऱ्हेचे तिरी एकसे मोरगावू ।**
**तिथे नांदतो मोरया जाण पाहू ।**
**चला जाऊ यात्रे महापुण्य आहे ।**
**मनी इच्छिले मोरया देत आहे ।।**

## श्री क्षेत्र मोरगाव :

पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात मोरगाव हे ठिकाण आहे. बारामतीपासून ३७ कि.मी. अंतरावर तर पुण्यापासून सुमारे ७० कि.मी. अंतरावर कऱ्हा नदीच्या काठावर हे स्थान आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा हा मोरगावपासून अगदी १७ कि.मी. अंतरावर आहे.

# मोरेश्वराचे देवालय :

चौदाव्या शतकात मोरया गोसावी यांनी या मंदिराची उभारणी केल्याची नोंद मिळते. विशेष म्हणजे या मंदिराची बांधणी मुसलमानी पद्धतीची आहे. मंदिराचे आवार बिदरच्या पातशाहीत जामदारखान्याचा अधिकारी असलेल्या गोळे या हिंदू अधिकाऱ्याने बांधले. मुसलमानी राजवटीतदेखील मंदिराला राजाश्रय होता हे विशेष होय. बिदरच्या महामूनी राजाच्या काळात बांधलेले आणि निजामशाहीत जिर्णोद्धार झाल्याचे दाखले मिळतात. घुमट आणि मनोरे यांच्यामुळे मोरेश्वराचे मंदिर दुरुन एखाद्या दर्ग्यासारखी भासते. प्राचीन काळापासून या मंदिराच्या भोवती बुरूजसदृश दगडी बांधकाम आहे. सभोवताली त्याच्या संरक्षणार्थ पक्का तट बांधण्यात आलेला आहे. जमिनीपासून या तटाची उंची जवळजवळ ५० फूट असावी. चार दिशेला कोपऱ्यात मिनारासारखे चार स्तंभ उभे असलेले आढळतात. तटाच्या आतल्या बाजूला चौकाच्या आठ कोपऱ्यांवर श्रीगणेशाच्या आठ प्रतिमा बसविलेल्या आहेत. दगडी मंदिरावर अनेक प्रकारचे नक्षीकाम केलेले आहे. मंदिराचे तोंड उत्तरेकडे आहे. मंदिर उंचवट्यावर असल्यामुळे मंदिरात शिरण्यापूर्वी पायऱ्या चढाव्या लागतात. मंदिराला असणाऱ्या अनेक दगडी पायऱ्या भाविकांना पुरातनतेची साक्ष देतात. पायऱ्या चढण्यापूर्वी नगारखाना असून नगारखान्याच्या खालच्या बाजूला आपल्या पुढील दोन पायात लाडू धरलेला उंदीर उभा आहे. त्याच्यापुढे १५ फूट उंचीवर दगडी चौथऱ्यावर नंदी बसलेला आहे. त्या दगडी चौथऱ्यापुढे १०-१२ फुट अंतरावर मुख्य मंदीर आहे. दुसऱ्या एका चौथऱ्यावर सभामंडप आहे आणि सभामंडपाला लागून, पूर्वेकडे देवाचे शेजघर आहे. सभामंडपापुढे दुसरा मंडप आहे. त्याच्या पूर्वेला नग्नभैरवाचे देऊळ आहे. सभामंडपाच्या पूर्वेला आवारामध्ये एक शमीचे आणि एक बिल्वदलाचे झाड आहे. पश्चिम दिशेला कल्पवृक्ष आहे. दर्शनाला आलेले भक्तजन याच वृक्षाला अनुष्ठान करीत असतात. मोरया गोसावी यांनी सुद्धा याच वृक्षाखाली तपश्चर्या केली.

तटाच्या आतल्या चौकाच्या आठ कोपऱ्यात मुद्‌गलपुराणात वर्णिलेल्या गणेशाच्या आठ प्रतिमा पुढीलप्रमाण आहेत : (१) एकदंत (२) महोदर (३) गजानन (४) लंबोदर (५) विकट (६) विघ्नराज (७) धूम्रवर्ण (८) वक्रतुंड. पूर्वीच्या मूर्ती जीर्ण झाल्यामुळे तेथे आता त्या नव्या करुन बसविल्या आहेत. तसेच तेवीस परिवारमूर्तीही नवीन करुन बसविण्यात आल्या आहेत : १. श्रीशमी देवी, २. श्रीमंदार गणेश, ३. श्रीदूर्वादेवी, ४. श्रीशुक्ल चतुर्थी देवी, ५. श्रीभ्रुशुंडी, ६. श्रीकृष्ण चतुर्थी देवी, ७. श्रीमोरया गोसावी, ८. श्रीपूर्वद्वार गणेश, ९. श्रीभगवान विष्णू, १०. श्रीदेवी लक्ष्मी, ११. श्रीदक्षिणद्वार गणेश, १२. श्रीभगवान शंकर, १३. श्रीदेवी पार्वती, १४. श्रीपश्चिमद्वार गणेश, १५. श्रीआदिशक्ती जगदंबा, १६. श्रीमदन, १७. श्रीरती देवी, १८. श्रीउत्तरद्वार गणेश, १९. श्रीभगवान सूर्य, २०. श्रीवराह, २१. श्रीमहीदेवी, २२. श्रीमोद गणेश, २३. श्रीप्रमोद गणेश.



## श्री मोरेश्वराची मूर्ती :

गाभाऱ्यात श्री मोरेश्वराची अत्यंत रमणिय अशी स्वयंभू मूर्ती आहे. मखरात बसविलेल्या उकिडव्या अवस्थेतील मूर्तीच्या डोक्यावर नागराजाने फणा पसरला आहे. श्री मोरेश्वराच्या डोळयात व बेंबीत हिरे बसवलेले आहेत. सोंड डावीकडे असून सबंध मूर्ती सिंदूरचर्चित आहे. मूर्तीच्या पुढयात पाषाणाचे उंदीर व मोर आहेत. मूर्तीच्या डाव्या व उजव्या बाजूला सिद्धी बुद्धीच्या पितळेच्या मूर्ती उभ्या आहेत. असे म्हणतात की, श्री मोरेश्वराची मूर्ती ही मूळची नव्हे. खरी मूर्ती रत्नांचा चुरा, लोह आणि माती यांनी बनलेली असून ती दृश्य मूर्तीच्या मागच्या बाजूस ठेवण्यात आलेली आहे. मूळ मूर्तीची स्थापना स्वतः ब्रम्हदेवानेच केली होती. पुढे पांडव तीर्थयात्रा करीत करीत येथे आले असताना त्यांनी मूळ मूर्तीला कुणाचा धक्का लागू नये म्हणून तिला तांब्याच्या पत्र्याने बंदिस्त करुन ठेवली आणि हल्लीची मूर्ती नित्यपूजेसाठी स्थापन करण्यात आली.

## नैमित्तीक उत्सव :

या क्षेत्रात होणाऱ्या उत्सवात चार महत्त्वाचे प्रकार मानलेले आहेत. एक विजयादशमीला, दोन भाद्रपद व माघ महिन्यातील चतुर्थ्यांना आणि चवथा सोमवती अमावस्येला.

विजयादशमीला येथील उत्सव पाहण्यासारखा असतो. त्याकरिता मुद्दाम ठिकठिकाणाहून लोक येतात. मोरगावचा कोणीही रहिवासी कुठेही राहत असला तरी दसऱ्याकरिता तो येथे येतो. त्या दिवशी रात्री ११ वाजता श्रींची पालखी आपल्या सेवकवर्गासह मोठ्या थाटाने निघते. पालखीचा संचार रात्रभर नेमलेल्या स्थानी झाल्यानंतर पहाटेस दक्षिणेकडील सोनेश्वराच्या देवळात ती येते. तेथे काही काळ ती स्थिरावते. नंतर श्रींची पालखी देवळात येते व तेथे आरती, धुपारती होऊन कार्यक्रम समाप्त होतो. सोमवती अमावस्येलाही पालखी निघते. नदीच्या पलीकडे पोवळी आहे. तेथे मोरया गोसावी आपल्या झोळीतून लोकांना प्रसाद वाटीत; पण झोळी कधीच रिती होत नसे, असे सांगतात. या पोवळीत प्रतिवर्षी भाद्रपद व माघ महिन्यात शु. ७ ला अन्न शिजवून भंडारा करण्याची पद्धत आहे.

भाद्रपद शुद्ध चतुर्थी व माघ चतुर्थी या दोन्ही तिथींना मोरगावला चिंचवडहून श्रींची पालखी येते.

# इतिहास :

अष्टविनायकांपैकी पहिला गणपती हा मोरगावचा मयुरेश्वर / मोरेश्वर. अष्टविनायकांच्यागणनेत या देवाला अग्रस्थान आहे. श्री मोरेश्वर गणेशाचे, हे स्वयंभू व आद्यस्थान आहे. हे क्षेत्र गाणपत्य संप्रदायाचे आद्यपीठ आहे. या क्षेत्राचे मूळ नाव 'भूस्वानंदभुवन' असे होते. भूमीच्या ज्या अंतर्भागात ही क्षेत्रवसती होती, त्या भागाचा आकार मोरासारखा होता. पूर्वीपासून या गावी मोरांची वस्ती असल्यामुळेही त्याचे नाव मयूरग्राम-मोरगाव पडले असावे. हे अत्यंत जागृत देवस्थान मानले जाते व येथे केलेली शुभ इच्छिते निश्चितपणे फळतात अशी भाविकांची श्रद्धा आहे.

ब्रह्मा, विष्णू, शिव, शक्ती व सूर्य या पाच देवतांनी येथे तप केले. तेव्हा आदिशक्तीस्वरुप श्रीगणेशाने त्यांना दर्शन दिले. त्यांनी प्रभूची प्रार्थना केल्यावरुन श्रीगणेशाने त्या क्षेत्रात वास्तव्य करुन त्याला श्रेष्ठत्व देण्याचे मान्य केले. या पंचदेवतांनी भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी येथे श्रीगणेशाची विधिपूर्वक प्रतिष्ठापना केली. येथे राहून जे पुरश्र्चरणादि करतील त्यांना मायाबंधनाची व विघ्नांची भीती मुळीच राहणार नाही असा गणेशप्रभूने आशीर्वाद दिला.

थोर गणेशभक्त मोरया गोसावी यांचा जन्म याच क्षेत्रात झाला. एक दिवस, ब्रह्मकमंडलू-तीर्थात स्नान करीत असताना त्यांना गणेशाची मूर्ती सापडली. या क्षेत्रात त्यांनी उग्र तपश्चर्या केली आणि सिद्धी प्राप्त करुन घेतली. श्रीरावेशाच्या आज्ञेवरुनच आपल्याला कुंडात सापडलेली मूर्ती चिंचवड येथे नेली आणि तेथे त्या मूर्तीची स्थापना केली व ते चिंचवडला येऊन राहिले. तरीसुद्धा प्रत्येक चतुर्थीला ते मोरगावची वारी करायला कधीही चुकत नसत. शेवटी पवनाकाठी त्यांना जिवंत समाधी घेतली.

अशाच दुसऱ्या एका सत्पुरुषाचा या क्षेत्राशी अठराव्या शतकाच्या शेवटी संबंध आला. ते सत्पुरुष म्हणजे गणेश योगींद्र हे होत. श्री मयूरेशाचा दृष्टांत झाल्यावरुन ते सोरटी सोमनाथाजवळच्या आपल्या आंबी या गावाहूनयेथे येऊन राहिले. चोवीस वर्षे त्यांनी श्रींची आराधना-उपासना केली. मुद्गलपुराण त्यांनी स्वहस्ते नकलून घेतले तसेच मुद्गलादेशशास्त्रही मोठ्या मेहेनतीने मिळवून त्याची नक्कल करुन घेतली. या दोन ग्रंथांवर त्यांनी टीकाभाष्य केले आहे. मयूरेश्वराचे मंदिर लहान होते. श्री. मोरेश्वर केशव गोळे यांच्याकरवी त्यांनी या देवळाचा जिर्णोद्धार केला. श्रीगणेश योगींद्र हे एक चांगले चित्रकारही होते ज्या जागी ते पुरश्र्चरणास बसत त्याच्या भोवतालच्या भिंतींवर त्यांनी मुद्गलपुराणात वर्णिलेल्या गणेशलीलांची चित्रे काढून ठेवली आहेत. ती आता बहुतांशी फिकी पडली आहेत. तथापि त्यावरुन त्यांच्या कलेची व गणेशभक्तीची कल्पना येते. चिंचवडकर श्री मोरया गोसावी आणि श्री गणेशयोगींद्र या सत्पुरुषांमुळे या क्षेत्राला एक आगळे महत्त्व लाभले आहे.

प्रत्येक घरात म्हटली जाणारी सुखकर्ता दुःखहर्ता ही आरती श्री समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली, असे म्हटले जाते.

## श्री मोरेश्वरासंबंधी पौराणिक कथा :


१) मोरगावच्या गणेशाला मोरेश्वर किंवा मयुरेश्वर असे नाव का मिळाले यासंबंधी मुद्गल पुराणातील सहाव्या खंडात एक कथा आहे ती अशी...

फार प्राचीन काळी मिथिल देशात गंडकी नगरीत चक्रपाणी नावाचा एक थोर राजा राज्य करीत होता. त्याला सूर्याच्या उपासनेने एक पुत्र झाला. त्याचे नाव सिंधू. सिंधुनेही सूर्याची उपासना करुन अमरत्वाचा वर मिळवला. त्यामुळे सिंधू उन्मत्त झाला. अवघ्या त्रैलोक्याचे राज्य आपणास मिळावे असे त्याला वाटले. मग त्याने पृथ्वी जिंकली. इंद्राच्या अमरावतीवर त्याने स्वारी केली. इंद्राचा अगदी सहज पराभव केला. त्याने स्वर्ग व्यापला. तेव्हा विष्णूने त्याच्याशी युद्ध सुरु केले. पण विष्णूलाही सिंधूचा पराभव करता येईना. सिंधूने आपल्या अतुल पराक्रमाने विष्णूला वश केले व त्याला गंडकी नगरीत राहण्याची आज्ञा केली. मग सिंधूने सत्यलोक व कैलास यांवरही स्वारी करण्याचे ठरवले. सर्व देवांना त्याने गंडकी नगरीत बंदिवासात टाकले. तेव्हा दुःखी झालेल्या देवांनी गणेशाची आराधना सुरु केली. प्रसन्न झालेल्या गणेशाने देवांना आश्वासन दिले. मी लवकरच पार्वतीच्या पोटी मयुरेश्वर या नावाने अवतार घेईन व तुमची सिंधूच्या जाचातून सुटका करीन.

सिंधूच्या त्रासाला कंटाळलेले शंकर पार्वतीसह मेरुपर्वतावर राहत होते. पुढे भाद्रपद शुद्ध चतुर्थीला पार्वती गणेश पूजन करीत असता ती गणेशमूर्ती सजीव झाली. ती बालकाचे रुप घेऊन पार्वतीला म्हणाली, ‘आई, मी तुझा पुत्र होऊन आलो आहे.’ याच वेळी गंडकी नगरीत आकाशवाणी झाली, ‘सिंधुराजा, तुझ्या नाशासाठी अवतार झाला आहे.’

गणेशाचे व सिंधूचे प्रचंड युद्ध झाले. गणेश एका प्रचंड मोरावर बसून युद्ध करु लागला. त्याने कमलासुराचा वध केला. कमलासुराच्या शरीराचे तीन तुकडे तीन दिशांना फेकले. कमलासुराच्या मस्तकाचा भाग जेथे पडला ते ठिकाण म्हणजेच मोरगाव क्षेत्र. मग गणेशाने सिंधू राजाचा पराभव केला व सर्व देवांची मुक्तता केली. तेथेच गणेश भक्तांनी विनायकाच्या मूर्तीची स्थापना केली. मोरावर बसून गणेशाने दैत्यसंहार केला, म्हणून त्याला मयुरेश्वर किंवा मोरेश्वर म्हणतात व त्या स्थानाला मोरगाव असे नाव मिळाले.

२) एकदा मोरगावामध्ये एका शिवमंदिरात नंदी बसविण्याचे ठरले. कारागिरांनी महाकाय नंदी घडविला व गाडीत घालून ते शिवमंदिरास चालले. नंदीचा गाडा गणेशमंदिरासमोर आल्यावर थांबला. तो काही केल्या पुढे जाईना. रात्री कारागिराला दृष्टांत झाला. मला श्रीगणरायाच्या सहवासात रहावयाचे आहे. त्यामुळे त्या नंदीची प्राणप्रतिष्ठा गणेशमंदिरासमोर करण्यात आली. आजही तो नंदी भक्तांना दर्शन देत श्रीगणेशमंदिरासमोर आहे.



# करुणाश्लोक

मोरया मोरया मी बाळ तान्हे । तुझीच सेवा करु काय जाणे ।।
अन्याय माझे कोट्यानुकोटी । मोरेश्वरा बा तू घाल पोटी ।। १।।
पिता माता बंधू तुजविण असे कोण मजला ।
बहू मी अन्यायी परि सकलही लाज तुजला ।।
न जाणे मी काही जप तप पुजा साधन विधी ।
कृपादृष्टी पाहे शरण तुज आलो गणपती ।। २।।
वळेना ही जिव्हा धड मज तुझे नामहि न ये ।
धरावे त्वा हाती अभयवरदा पूर्ण अभये ।।
अनाथांच्या नाथा झडकरी करी आस पुरती ।। कृपा०।।३।।
भुकेलो केव्हाचा ह्दय निष्ठुर न करी झणी ।
प्रसादाचा लाडू कवळ बरवा घाल वदनी ।
सदा ब्रह्मानंदे मग तुजपुढे नाचत प्रिती । कृपा० ।। ४।।
बहू बोलू काही परमसुखदा मंगलनिधी ।
मला तारी आतां अति कठिण संसारजलधी ।
स्वभावे गोसावीकृत करितसे हेचि विनती । कृपा० ।।५।।